पुण्य नगरी

व्हिडीओ कॉलद्वारे भिती दाखवून लुबाडणाऱ्यांपासून रहा सावध : टिना पाटील

यावल : सद्या व्हिडीओ कॉलवर आपण पोलिस अधिकारी आहोत, असे सांगत भिती दाखवत डिजिटल अरेस्टच्या नावाने लुबाडण्याचा प्रकार सुरू आहे. डिजिटल अरेस्ट होतच नाही. तेव्हा असे कॉल आल्यास स्थानिक पोलिसांना माहिती द्यावी आणी आपली फसवणूक टाळावी, असे आवाहन सायबर तज्ज्ञ टिना पाटील यांनी केले.

सांगवी बुद्रुक येथील ज्योती विद्या मंदिर शाळेत सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमात त्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होत्या. ज्योती विद्या मंदिरात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सायबर शिक्षा व सुरक्षा कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. सोमवारी हा कार्यक्रम पार पडला. यात हॅकर मास्क च्या माध्यमातून सायबर फसवणुकीचे प्रात्यक्षिक सायबर तज्ज्ञ टीना पाटील आणि दर्शना चौधरी सादर केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक आर. एस. भंगाळे, तर प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्यध्यापक चंद्रकांत फिरके होते. सूत्रसंचालन प्रसेनजित बाविस्कर यांनी करुन आभार ही मानले.

Jalgaon Edition
Aug 13, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com